Shri. Mahesh Kakade,
Controller of
Examinations

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR- 416 004, MAHARASHTRA**
PHONE : EPABX- 2609000 (10 Lines), 2693643 (9 Lines), 2693730 (9 Lines)
GRAM : UNISHIVAJI TELEX : 0195 559 SUK IN
PHONE : (Direct) 2693176, 2609067 FAX :(Direct) 0091-0231-2690655
Website : www.unishivaji.ac.in E-mail : coe@unishivaji.ac.in

Ref. No. : SU/EXAM/ON DYR/13-14/ DATE : 14-Oct-14 6:31:21 PM

प्रति,

प्राचार्य/संचालक,
संलग्नित महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्था,

विषय :- १. अंतर्गत/सत्रकर्म(टर्मवर्क)गुणांची डाटा एन्ट्रीसाठी प्रणाली उपलब्ध करून देण्यात आल्याबाबत..
२. प्रथम वर्षाच्या उत्तरपत्रिका तपासणी व गुण संगणकीय प्रणालीमध्ये भरण्याबाबत..

महोदय,

वरील विषयासंदर्भात आदेशान्वये कळविण्यात येते की, ऑक्टोबर-२०१४ मध्ये होणा-या परिशिष्ट-१ मधील परीक्षांचे संपूर्ण म्हणजेच निकालासह सर्व कामकाज डियु पोर्टलवरून होणार आहे. याअनुषंगाने खालील बाबीचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

**अ) अंतर्गत/ सत्रकर्म(टर्मवर्क) गुणांची डाटा एन्ट्री :**

१. सोबतच्या यादीपैकी ज्या अभ्यासक्रमांना अंतर्गत/ सत्रकर्म(टर्मवर्क)/प्रात्यक्षिक गुण आहेत अशा परीक्षांचे अंतर्गत/टर्मवर्क/प्रक्टिकल गुण भरण्यासाठी डियु पोर्टलवर प्रणालीद्वारे सुविधा करून देण्यात आली आहे. डियु पोर्टलवर प्रणालीद्वारे हे गुण भरणे आवश्यक आहे. दूर शिक्षण प्रणालीमधील विद्यार्थ्यांचे सदरचे गुण संबंधित अभ्यासकेंद्रांनी (स्टडी सेंटर्स) भरावयाचे आहेत.
२. सदर प्रणाली दिनांक २२ ऑक्टोबर २०१४ पासून ऑन लाईन उपलब्ध करून देण्यात येईल. महाविद्यालयातील संबंधितांनी अंतर्गत/टर्मवर्क/प्रक्टिकल गुणांचे फिडींग दिनांक १० नोव्हेंबर, २०१४ अखेर पूर्ण करून त्याची छापील प्रत संबधित विषय शिक्षक/परीक्षक यांच्या सहीने प्रमाणित करून त्या त्या परीक्षा विभागात दिनांक १५ नोव्हेंबर २०१४ पूर्वी किंवा पर्यंत पाठविणे आवश्यक आहे. गुण ऑन लाईनच भरणे आवश्यक आहे. सीडी पाठवू नयेत. दूर शिक्षण प्रणालीच्या विद्यार्थ्यांबाबत सदरची प्रत दूर शिक्षण केंद्राच्या संबंधित समन्वयकांकडे जमा करावयाची आहेत.
३. निर्धारित तारखेनंतर आलेले गुण कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत अशा सूचना सर्व संबंधितांना देण्यात याव्यात ही विनंती. गुण भरण्याची ऑन लाईन सुविधा निर्धारित तारखेस बंद झाल्यानंतर ती पुन:श्च उपलब्ध करून देण्यात येणार नाही याबाबत सूचना संबंधितांना द्याव्यात.

**ब) प्रथम वर्षाच्या परीक्षांच्या उत्तरपत्रिकांची तपासणी व गुण भरणे :**

१. प्रथम वर्षाच्या परीक्षांच्या उत्तरपत्रिका तपासणीच्या कामास प्राधान्य देऊन त्या त्या दिवशीचा पेपर झाल्यापासून हे काम सुरू करावे.
२. हे काम १० दिवसात संपूर्ण काम पूर्ण करून घ्यावे व त्या गुणांची एन्ट्री पेपर तपासणी झाल्यादिवशीच पूर्ण करावी.
३. संगणकीय प्रणालीद्वारे भरलेल्या गुणांची मार्कलिस्ट छापील प्रत काढून त्यावर परीक्षकाची व परीक्षा समिती प्रमुखाची स्वाक्षरी करून त्या प्रती संबंधित परीक्षा विभागाकडे जमा तात्काळ जमा करावयाच्या आहेत.
४. गुणांची डाटा एन्ट्री करण्यासाठी संबंधित परीक्षकांनी डियु पोर्टलची माहिती करून घ्यावी. सोबत जोडलेल्या माहितीपत्रकाप्रमाणे डाटा एन्ट्री करावी. आवश्यक तेथे महाविद्यालयातील जबाबदार लिपिकाची मदत घ्यावी. सदर कार्य गोपनीय असल्याने परीक्षांशी संबंधित घटकांकडूनच गुण भरले जावेत. इतरांचा सहभाग टाळावा. गुणांची डाटा एन्ट्री करण्यासाठी विद्यापीठाच्या मान्या दराने मेहेनताना संबंधितांना देण्यात यावा.
५. प्रथम वर्षाच्या सर्व विषयाचे, सर्व विषयांचे गुण फिड झाल्याची खात्री परीक्षा समितीप्रमुखांने करून घ्यावी व त्यानंतरच डाटा एक्स्पोर्ट करावा.

.......२

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR- 416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX- 2609000 (10 Lines), 2693643 (9 Lines), 2693730 (9 Lines)
GRAM : UNISHIVAJI TELEX : 0195 559 SUK IN
PHONE : (Direct) 2693176, 2609067 FAX :(Direct) 0091-0231-2690655
Website : www.unishivaji.ac.in E-mail : coe@unishivaji.ac.in

Shri. Mahesh Kakade,
Controller of
Examinations

Ref. No. : SU/EXAM/ON DYR/13-14/ DATE : 14-Oct-14 6:31:21 PM



६. दूरशिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाच्या उत्तरपत्रिका स्वतंत्र ठेवाव्यात व तपासून त्यांच्या गुणांची एन्ट्रीही याच पध्दतीने करण्यात यावी. त्यासाठीचा खर्च अन्य परीक्षांसाठी पाठविण्यात आलेल्या ॲडव्हान्स रक्कमेतून करावा.

७. प्रथम वर्षाच्या निकालानंतर जर विद्यार्थ्यास फेरतपासणी/गुणपडताळणी करावयाची असल्यास ती विद्यापीठाच्या नियमानुसार शुल्क आकारणी करून महाविद्यालयीन पातळीवर यापूर्वी दिलेल्या सूचनांनुसार करवून घ्यावी. प्रथम वर्षासाठीचे फेरतपासणी/गुणपडताळणी शुल्क महाविद्यालयातच ठेवावे व ते फेरतपासणी/गुणपडताळणी इत्यादी कामकाजासाठी वापरावे.

८. फेरतपासणी/गुणपडताळणीचे सुधारित गुण परीक्षा विभागाकडे पाठविताना त्या उत्तरपत्रिकेचे मुखपृष्ठ आणि त्याचे आतील म्हणजेच ज्या पानावर फेरतपासणीचे गुण दर्शविण्यात येतात त्याची फोटोप्रत परीक्षा समितीप्रमुखांनी साक्षांकित करून महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या सहीच्या पत्रासह लखोटयावर गोपनीय असा उल्लेख करून परीक्षा नियंत्रक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या पत्त्यावर तात्काळ पाठवावी.

९. महाविद्यालयांमधून माहिती न मिळाल्याने अद्यापि प्रथम वर्षाच्या फेरतपासणी/गुणपडताळणीसाठी कांही विद्यार्थ्यांना परीक्षा विभागात पाठविले जाते. तरी प्रथम वर्षाच्या फेरतपासणी/गुणपडताळणीसाठी अर्ज आणि शुल्क महाविद्यालयातच भरणा करावयाचे असल्याची माहिती महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डवर निकालानंतर तात्काळ लावावी.

१०. प्रथम वर्षाच्या ७५ टक्के रक्कमेचे हिशोबाच्या नोंदी व्यवस्थितपणे ठेवाव्यात.

११. जे विषय आपल्या महाविद्यालयात शिकविले जात नाही अशा विषयांच्या उत्तरपत्रिका यापूर्वीच्या मध्यवर्ती मूल्यमापन विभागाच्या परिपत्रकानुसार तपासून घ्याव्यात.

कृपया वरील माहिती सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून त्याप्रमाणे कार्यवाही करवून घ्यावी व परीक्षा आणि निकालाचे कामकाज सुरळितपणे पार पाडण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

(श्री. महेश काकडे)
परीक्षा नियंत्रक

प्रत :-

१. लेखा विभागास माहितीसाठी
२. संचालक/उपकुलसचिव, दूरशिक्षण केंद्र
३. सर्व परीक्षा विभागप्रमुख व उपकुलसचिव/सहाय्यक कुलसचिव

C:\Users\acer\Desktop\navin file COE MK Tarankint question.doc/mahadeshwar/